तत्वाचा बंदा जीव मूर्तीला कोण विचारी ?

# प्रभूतरुण

Keeping the Pathare Prabhu community updated since 1923

MARCH 2024 – Issue No. DPT 03

editor.prabhutarun@gmail.com

*From the Editor's Desk*

**कल्पना सुनील राणे**



## आला रे आला... गेला रे गेला...

कोण? अहो, असं काय विचारताय? मराठी भाषा दिन आणि महिला दिन... आले आणि तसे गेलेही. दरवर्षी २७ फेब्रुवारी रोजी मराठी भाषा दिन व ८ मार्च रोजी महिला दिन साजरे केले जातात.

मराठी भाषा दिनी सरकारी पातळीवर अनेक कार्यक्रमांचं आयोजन केलं जातं. यंदाही अभिवाचन, परिसंवाद, परिचर्चा, सत्कार सोहळे, बक्षीस समारंभ... असं बरंच काही आयोजित केलं होतं. “लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी...” अभिमान गीतं म्हटली गेली. काही ठिकाणी. वाजवली गेली.

पण हा दिवस आपण साजरा का करतो? तेही एकच दिवस? मग तो आपण वर्षभर का पाळत नाही? एक दिवस गौरव केल्याने मराठी भाषेची समृध्दता वाढते का? बाकीच्या दिवसांत मराठी भाषेचं आपण काय करतो?... वगैरे प्रश्न मनात आले म्हणून हा लेखन प्रपंच.

भाषेच्या संवर्धन, जपणूक व योग्य वापर याबद्दल बरेचजण हिरीरीने बोलतात. परंतु इंग्रजी माध्यमात शिकणाऱ्या मुलांना मराठीविषयी जिव्हाळा, आपुलकी आहे का यावर कोणी बोलत नाही. शासनाच्या वतीने भाषेचा प्रचार, संवर्धन आणि प्रसारासाठी आखलेल्या योजना हा त्यांच्या कामाचा भाग झाला. परंतु मराठी लोकांना मातृभाषेविषयी काय वाटतं याचं उत्तर शोधणं महत्त्वाचं वाटतं. जर त्यांना खरंच आपल्या मातृभाषेबद्दल आत्मियता वाटत असेल तर त्यांच्या वाचनात आणि बोलीभाषेच्या उच्चारात नक्कीच बदल दिसून आला असता.

इंग्रजी ही व्यवहाराची भाषा आहे आणि ती आलीच पाहिजे. इंग्रजी शिकण्याला आणि त्याच्या वापराला विरोध नाहीच. विरोध आहे तो मराठीला कमी लेखण्याला. अनेक घरात बोलीभाषा म्हणून मराठीपेक्षा इंग्रजीला प्राधान्य मिळत असल्याचं चित्र आहे आणि ते पालकांकडूनच होताना दिसत आहे. आणखी एक समज असाही आहे की मराठी शिकण्याने वा बोलण्याने आपलं काही भलं होणार नाही. भले मराठी माध्यमातून शिकू नका, पण मराठीतून संवाद नक्कीच साधता येऊ शकतो. आपणच आपल्या भाषेचे मारेकरी बनूया नको. लहानपणी ज्या भाषेत स्वप्नात बोललो, स्वत:च्या मनाशी बोललो, प्रथम उच्चार अ, आ, बाबा, मामा... हे सगळं ज्या मराठी भाषेतून केलं तर ती बोलण्याने भलं होणार नाही?

जगात बोलल्या जाणाऱ्या भाषांची आकडेवारी पाहिली तर जास्त बोलली जाणारी मँडरीन ही भाषा आहे. चीनमधली ही भाषा बोलणारे जगभर ९५ कोटी लोक आहेत. इंग्रजीत बोलणारे ३८ कोटी, हिंदी भाषा बोलणारे ३५ कोटी आणि मराठी भाषा बोलणारे ८.५ कोटी आहेत आणि जगभरातून मराठीचा

नंबर तेरावा लागतो. संगणक वापरामुळे इंग्रजीचं वर्चस्व सगळ्या देशांत आहे. पण तरीही चीनने त्यांच्या मँडरीन भाषेचा वापर कायम ठेवला आहे. तीच स्थिती दक्षिणात्य भाषांचीसुध्दा आहे आणि त्यांनी त्यांच्या मातृभाषेचा वापर यत्किंचितही कमी केलेला नाही.

इंग्रजी या ज्ञानभाषेचा वापर आणि शिक्षण महत्त्वाचे आहे. पण मराठी ऐवजी आम्ही फक्त इंग्रजीमध्येच बोलणार हे कितपत योग्य आहे? अनेकदा असं वाटतं की मराठी भाषेबद्दल वाटणारा आकस, न्यूनगंड मनातून काढला तर मराठीतून बोलण्याची लाज वाटणार नाही. जर जोडीदार अमराठी असेल तर त्याला/तिला मराठी शिकवणं शक्य आहे. पण मनातच तसं नसेल तर मग कसं शक्य होणार?

परंतु होतंय असं की गरज नसताना इंग्रजी भाषेच्या कुंडीत मराठी भाषेचं रोप रूजवलं तर त्याचा परिणाम धड ना मराठी धड ना इंग्रजी असं काहीसं होऊ लागलंय. तेव्हा मनापासून असं वाटतं की मातृभाषा मराठीच्या समृध्द परंपरेशी असलेलं नातं कायम जपूया आणि आपल्या परंपरेशी, संस्कृतीशी जोडून राहूया. मातृभाषेच्या प्रेमापोटी तसंच मराठी भाषा दिनाचं महत्त्व सफल करण्यात खारीचा वाटा उचलूया.

.....

बाईपण भारी देवा

दुय्यम दर्जाची वागणूक आणि उपभोग व कष्टाचे साधन म्हणजे स्त्री, असा समज एकोणिसाव्या शतकाच्या अखेरपर्यंत रूढ होता. पुरूषांबरोबर समानतेने वावरणं, संपत्तीवर अधिकार, शिक्षण, विचार स्वातंत्र्य किंवा मतदान अशा अधिकारांपासून समाजातल्या स्त्रिया वंचित होत्या. देश-विदेशातून त्या-त्या समाजातून सर्वसाधारणपणे स्त्रियांची अशीच स्थिती होती. परंतु एकोणिसाव्या शतकाच्या मध्यानंतर, जसा स्त्री शिक्षणाचा प्रसार होऊ लागला तसा स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाची, तिच्या

हक्कांची विदेशातल्या स्त्रियांमधे सजगता येऊ लागली. त्यातूनच स्त्रीवाद किंवा फेमेनिझम (हा मूळ फ्रेंच शब्द आहे) याचा जन्म झाला. फेमेनिझम हा शब्द जेव्हा पहिल्यांदा वापरला गेला, तेव्हा त्याची सर्वत्र चेष्टा केली गेली. राणी व्हिक्टोरियासुध्दा या चेष्टेत सामील झाली होती. स्त्रीवाद म्हणजे मूर्खता आणि समाजाच्या दृष्टीने महाचूक असल्याचं म्हणत तिने त्यावेळी त्याची संभावना केली होती. त्यानंतर महिलांनी स्वतःच्या हक्कासाठी लढा दिला आणि त्या लढ्याच्या स्मरणार्थ दरवर्षी, ८ मार्च हा दिवस जागतिक महिला दिन म्हणून साजरा करण्याची प्रथा रूढ झाली.

या दिवसाच्या माध्यमातून महिलांचे अधिकार आणि लिंग समानतेबद्दल जागरूकता वाढविण्याचा प्रयत्न केला जातो. विविध कार्यक्रमांचं, सत्कार-पुरस्कारांचं, चर्चासत्रांचं आयोजन करून जागरूकता आणण्याचा प्रयत्न केला जातो. आपल्या देशात आज महिला अतिशय महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. त्यांनी अनेक क्षेत्रात लक्षणीय यश संपादन केलं आहे. निरनिराळ्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे आणि करत आहेत. सत्तेची पदं भूषवत आहेत. आपलं वेगळेपण सिध्द करत आहेत. हा दिवस त्यांच्या कर्तृत्वाचा उत्सव साजरा करण्याचा आणि त्यांनी केलेल्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा आहे.

ही झाली महानगरातल्या महिलांची गोष्ट. पण तरीही शिक्षण आणि सामाजिक हक्कांच्या जाणीवेपासून अनेकजणी आपल्या समाजात आजही वंचित आहेत. आफ्रिकेतल्या छोट्या देशांनी त्यांच्या समाजात स्त्रियांसाठी अनेक बदल घडवून आणून प्रगती पथावर वाटचाल सुरू केली आहे.

नोकरीसाठी स्वखुशीने किंवा परिस्थितीमुळे घराबाहेर पडलेल्या स्त्रियांना नोकरीच्या ठिकाणी असलेली लिंगविषमता आणि लैंगिक शोषण POSH कायदा असूनही खटकत आहे. पुरुषांइतकेच काम करूनही पगारात समानता नाही आणि समान संधीचीही कमतरता जाणवते आहे. पश्चिम देशांतल्या महिलांच्या लढ्यामुळे आपल्या हक्कांबाबत स्त्रियांमध्ये जागरूकता निर्माण होत असली तरी ग्रामीण, निमशहरी भागांत जागरूकता होणं गरजेचं आहे. समाजाची वृद्धी होण्यासाठी महिला वर्ग अजून प्रगत होण्याची गरज आहे.

स्त्रियांचे आत्मभान जागृत करण्याचे मोलाचे काम काही स्त्रियांच्या योगदानामुळे झालं. देशातल्या आणि घरातल्या दोन्हीकडच्या स्त्रियांच्या सहयोगाने. देशांतल्या महिलांनी प्रेरणा दिली, विचार दिला आणि घरातल्या खंबीरपणे पाठीशी उभ्या राहिल्या. त्या महिलांबद्दल प्रत्येकीच्या मनात सदैव कृतज्ञता राहील. कारण प्रत्येक यशस्वी स्त्रीमागे एक स्त्रीच उभी असते. 'ती'चा सन्मान हा फक्त ८ मार्चपुरता नसून रोजचा आहे. म्हणूनच बाईपण हे भारीच आहे देवा…

…..

सलाम

नोबेल पुरस्काराइतकाच सर्वश्रेष्ठ समजला जाणारा यंदाचा ज्ञानपीठ पुरस्कार प्रसिध्द कवी, दिग्दर्शक व लेखक गुलजार यांना जाहीर झाला आहे. त्यांच्या समृध्द लेखणीतून उतरलेली सिनेगीतं, गझला, कविता, कथा, पटकथांचा बहूमूल्य ठेवा पुढच्या अनेक पिढ्यांसाठी, सिनेशौकिनांसाठी अनमोल आहे. त्यांच्या लेखणीने, त्यांच्या भाषेने, त्यातल्या उर्दू शब्दांच्या पखरणीने अनेक विखुरलेली मनं सावरली आहेत. विरह सोसायला शिकवला आहे. प्रेमाचा अंकुर फुलवला आहे आणि नाती जपायलाही शिकवलं आहे. उर्दू भाषेची नजाकत उलगडून सांगणाऱ्या या अवलियाच्या कल्पक लेखणीला, त्याच्या कामगिरीला सलाम!!

आदरांजली

गझल गायक म्हणजे मेहंदी हसन ज्या नव्वदीच्या दशकांत असे समीकरण होतं त्या काळात " चिठ्ठी आयी है आयी है चिठ्ठी आयी है…" हे 'नाम' सिनेमातलं गाणं लोकप्रियतेच्या शिखरावर आरूढ झालं आणि मखमली आवाज असणारं पंकज उधास हे नाव घराघरात पोहोचलं. त्या गझल गायकीची मैफिल आता उठली आहे.

उत्कृष्ट, रसपूर्ण निवेदनशैलीमुळे संगीतप्रेमींच्या गळ्यातला ताईत बनलेले निवेदक अमीन सयानी! त्यांचा बिनाका गीतमाला हा रेडिओ सिलोनवरील कार्यक्रम अनेक दशकं गाजवला. हक्काच्या प्रेमळ आवाजाने आता निरोप घेतला आहे. पंकज उधास आणि अमीन सयानी यांच्या जाण्याने संगीतशौकिन खूप हळहळले आहेत. त्यांना आदरांजली.

# Roots



**Rohit Trilokekar**

I have forever pondered over the term 'roots, and what it truly signifies. It took me several years to come to the realization that I belong to that rare breed of Maharashtrian called Pathare Prabhu, that numbers only around 7000 worldwide.

Not a dying breed, mind you.

We are characterized by our extravagant sense of ‘living.’

Pathare Prabhus were the amongst the original settlers of Mumbai. So, I would revel in childish delight as my friends seemed dumbfounded when they asked me what my gaon was, and I replied that it is none other than Mumbai itself!

I fondly remember lazy Sunday afternoons, bonding over typical Pathare Prabhu fare. A pint or two of chilled beer. Looking back, we were bonding with the larger Pathare Prabhu fraternity. What about food evokes such a strong sense of community? That Gujarati khandvi shared with a cup of tea at your Gujju friend’s home might evoke images of a genteel Gujarati gentleman going to office in his starched white shirt. A succulent biryani might have you saunter across the halls of history, to the court of the emperor Shah Jahan.

When I was young, I always believed a sense of community was unimportant; that one mustn’t divide themselves on the basis of caste and community. While that is still the broader picture, it’s important for all of us human beings to know where we came from. To hearken back to the evolution of our communities, that all strove to look at life in myriad ways. The communities that gave us a history to be proud of; comprising people who formed the actual roots that helped us blossom into the flowers we are today.

Roots are important because they give you a sense of who you are.

And that legacy is passed on to us through food.

I belong to the Pathare Prabhu community. Kolambi khadkhadla is one of its signature dishes, and one that I love fondly. But this passion for my community delicacies, is merely a stepping stone towards something larger. Towards bonding with other Pathare Prabhus, something I failed to do in my formative years.

When Sanjana Kothare asked me if I would like to contribute to the online version of Prabhu Tarun, I uttered an unequivocal ‘Yes’, without batting an eyelid. The feeling was instinctual, seemingly coming from a place deep within. This, in a sense, was me trying to make amends for all the time lost. Precious time wasted, in not connecting to my roots, when they were one of the primal reasons behind shaping me into the man I have become today.

Which is why, I urge you all to write your hearts out. So that we might learn more about our beloved Pathare Prabhu community, and its many wonderful nuances. When we pass an old Pathare Prabhu bungalow that has weathered the years, let that serve as a proud testament to the fact that long before many others, we were here. That we have some responsibility, to ensure the upkeep of not only our community, but also the precious land beneath our feet.

Before I sign off, I'd like to reiterate that I  (as well as all PPs, I'm sure) would love to hear more from Pathare Prabhus worldwide. Whether it's taking a trip down memory lane with some vintage photographs from a bygone era, or perhaps looking forward to something exciting to come.

And yes, let's meet whenever we can, and share anecdotes, or simply enjoy a cup of hot 'chaha' together!

# काही जागा राखीव

**संजय शरद दळवी**



प्रिय रंगकर्मी,

सुरुवातीसच तुमच्या कलेला मानाचा मुजरा करून विषयाला हात घालतो.

नाटक बघणे म्हणजे मराठी माणसाच्या आयुष्यातील एक आनंदाचा सोहळा.
पेपरमधील जाहिराती नीट वाचून, आपल्या लाडक्या अभिनयसम्राटांची जुगलबंदी पाहण्यासाठी, जेवढ्या पुढच्या रांगेतल्या आणि त्याही मध्यावरच्या जागा आरक्षित झाल्या की जीव भांड्यात पडतो. आमच्या लहानपणी, पहिल्या रांगेतील मध्यावरच्या जागेवर बसून मी खूप नाटके बघितली आहेत. नट-नट्यांच्या चेहऱ्यावरचे हावभाव टिपताना एक अनोखी अशी सुखद भावना मनात दाटून यायची. जे समोर वावरत, ते तर आमचे देवच जणू, आणि देवांना इतक्या जवळून निरखायची संधी म्हणजे आमच्या लेखी दुग्धशर्करा वा माणिकांचन योग, पर्वणीच म्हणाना!

पण हळू हळू हे भाग्य बदलत गेले. 'काही जागा राखीव' नावाच्या एका  तळटिपेने आधी जाहिरातीत चंचूप्रवेश केला, आणि मग ह्या तळटिपेने कधी अजस्त्र रूप धारण केले ते कळलेच नाही. 'प्रेक्षक देवो भव:' केवळ कागदावर लिहिण्याचा एका शब्द उरला. ह्या काही राखीव जागा म्हणजे पहिल्या सात ते आठ रांगा तर कधी त्याहूनही जास्त, आणि उरलेल्या, आजूबाजूच्या, पाठमागच्या रांगा ह्या पैसे भरून येण्याऱ्या प्रेक्षकांच्या, असे जणु अलिखित समीकरण बनले.

मान्य करतो आम्ही, रंगकर्मींना आपल्या माणसांना, मान्यवरांना बसवण्यासाठी काही जागा हव्या, पण त्या प्रत्येक प्रयोगाला हव्यातच का? आज ५०० रुपये देऊन आम्ही बाजूला वा दूर बसायचे? का? कोणी दिला हा हक्क नाटक सादर करण्याऱ्या लोकांना? हल्लीचीच गोष्ट सांगतो. एका विश्वविक्रमी नटाच्या अतिशय लोकप्रिय नाटकाला, आणि त्याचे कित्येक प्रयोग झाल्यानंतर बघायचा योग आला. देवाशप्पथ, जास्तीत जास्त किंमत असलेले तिकीट काढून आम्ही त्या प्रयोगाला गेलो, तर आमची रांग शेवटची होती. शेवटची? हा काय चावटपणा आहे? म्हणजे, एका बाजूने प्रेक्षक आमचे मायबाप असे म्हणायचे आणि दुसऱ्या बाजूने अशी गळचेपी करायची? का, तर आम्ही तुमच्यावर प्रेम करतो म्हणून?

आम्ही समजू शकतो, शुभारंभाचे काही प्रयोग वा मैलाचे दगड म्हणजे १००, २००, ३०० वा प्रयोग आहे, तुम्ही अनेकांना आमंत्रण दिले असते, त्यांची सोय बघायला तर हवीच ना? पण इतर सर्व वेळी पहिली वा दुसरी रांग भरलेलीच कशी असते? कशी पेक्षा, का असते ती भरलेली? का नाही ह्या जागा आम्हा प्रेक्षकांसाठी राखीव करता येत?

सिनेमावाले प्रीमियर शो करतात, तसे तुम्ही करा ना. आमच्या जीवावर नाचून आमचीच उपेक्षा करता?

एका लक्षात ठेवा. ही एका सावधगिरीची, आपुलकीने केलेली सूचना आहे. आम्ही तुमच्यावर प्रेम करतो, ते तुमच्यातील कलाकारावर असते, तुमच्या कलेवर असते. आमच्या प्रेमाची अशीच जर का उपेक्षा करत राहिलात तर आम्हीही हाडाचे मराठी आहोत. मोडू पण वाकणार नाही.  'काही जागा राखीव' ही तळटीप तुमचा कायदेशीर आधार असेलही, पण प्रेक्षकांचे प्रेम असेच लाथाडू लागलात, तर तेही तुम्हाला लाथाडायला कमी नाही का करणार? हे पत्र, हाच मराठी नाट्यवेड्या माणसाचा इशारा समजा, आणि आता तरी भानावर या. आम्हा सर्वांना, तुम्ही, तुमच्या कलेसह अतिप्रिय आहात, पण म्हणून आम्हाला गृहीत धरू नका हीच विनंती.

कळावे,

लोभ आहेच, तो वाढावा म्हणून दोन्ही बाजूने प्रयत्न करूया,

आपलाच

एका मराठी नाट्यवेडा

# नर्तन

**मुकुला राणे नवलकर**



आज पुरं करायचचं, म्हणून मी मेजापाशी आले.
पुढ्यातली खिडकी पार उघडून टाकली.
पूर्वेला प्रकाशाची चाहूल होती.
फिकट निळसर आकाशात,शुभ्र ढगांचे पुंजके
पिंजून पिंजून पसरले होते.
खूप उंचावर, आकाशात
एखाद् दुसरी घार, संथ संथ विहरत होती.

पलीकडे डवरलेला सोनबहावा, शेंडे झुलवत,
आपल्याच नादात रंगला होता.
शिरीष, गुलमोहोर आणि शंकासूरही,
त्याच्या सोबतीने डोलत होते.
त्यांच्या शाखा, खिडकीशी झिम्मडझिम्मा
खेळत, रमल्या होत्या.
झुळझुळत्या वाऱ्यावर, त्यांच्या पानाफुलांचा
संमिश्र गंध पसरला होता.

तुरुतुरु पळणाऱ्या खारुबाई, घायकुतीला येत,
तीव्र स्वरात, साद घालणाऱ्या मैना,
पार शेंड्यावर बसून आंदोळणारे राघू,
या साऱ्यांना पाहताना, मला हुरुप आला...

आसन जमवत, कागद पुढ्यात ओढले.
त्यावर लेखणी टेकवली मात्र...
सभोवार हिरव्याशार वातावरणात,
धुसर, अस्पष्ट हालचाल जाणवली.

हिरव्या पोपटी पानावरून, झरझर झरझर
पदन्यास करीत ती खाली आली आणि
अगदी माझ्या समोरच, अलगद उतरली.

तिने नजर उचलून माझ्याकडे पाहिले.
मान वेळावून ती लाडीक हसली... आणि गिरकी घेत
पुन्हा तिच्या नादात नादावली.
अल्लड वेधक हावभावात तन्मयतेने हरवून गेली.
नृत्यमग्न भावावस्थेत तद्रुप झाली.
पाहता क्षणीच, मी तिच्या आरस्पानी सौंदर्याने पार हरखून गेले होते...

लहानखुरा नाजूक बांधा.
नितळ उजळ कांती.
पुनवेच्या चंद्रबिंबासारख्या गोलाकार चेहऱ्याला,
सोनेरी मुलायम कुंतलांच्या, रेशीमलडींची महिरप.
तलम वस्त्रांकीत, कोमल अंगप्रत्यंग.
चपळ हालचालीतली डौलदार नजाकत...

एक हात सरळरेषेत उंचावून, एक समांतर ठेवून,
पावलांच्या टोकावर स्वतःला तोलून,
झर्रकन गिरकी घेत तिची, नृत्यलीला चालली होती.

समेवर येताना ती, कधी आपले बोलके डोळे झुकवत तर कधी कमरेत आदबशीर झुकत, मला मैत्राचे आमंत्रण देत, सविनय खुणावत होती.
पुन्हा पुन्हा बोलावीत होती.
तिच्या लाडीक विभ्रमांनी मोहीत, मी पुरती घायाळ झाले होते.
तिच्या भावविभोर धाग्यात, मी पुरती गुरफटले होते
तिचे आर्जवी निमंत्रण, मी कसे अव्हेरु शकत होते?
...आणि त्याचवेळी ती, थेट माझ्या समोरच अवतरली. आपला नाजूक हात पुढे करून, मला आग्रह करु लागली...

तेव्हा मात्र मी म्हटलं, अगं, मला जमणार नाही गं!!
कसं शक्य आहे, तुझ्या सोबत पावलं टाकणं?
तुझं चालू दे, मी इथूनच ताल देते.
तेवढीच आपली संगत सोबत...!!

ती खुद्कन हसली. तिच्या दोन्ही गालांवरील
इवल्या इवल्या खळ्यात, माझी नजर गटांगळ्या खात राहिली.
मग मात्र ती सहज वळली,
झालरींचा घोळदार झगा, बोटांच्या चिमटीत धरुन,
उडत्या पावलांनी उन्हाच्या कवडश्यात पोहोचली.

आता तिचं हिरण्यमयी रुपडं झळाळून गेलं.
दवबिंदूतून परावर्तित होत, विघटीत होणाऱ्या सातरंगांत, न्हाऊन निघालं.

तिच्या लोभस स्मिताने सुगंधित तुषारांची,
मंद दरवळणारी शिंपण झाली.
सजग तरी, अदृश्य आणि अस्फुट
साजिंद्यासह ती तिच्या साधनेत उतरली.

आणि त्यानंतर मात्र, ती आपल्याच विश्वात
आपल्याच तंद्रीत रमली.
भिंगरी सारखी भिरभिरत,
तालमात्रांच्या आवर्तनात खुळावली.
स्वरमण्डलांच्या आरोह अवरोहात हरवली.
लोभस भावमुद्रा, निरागस अदा...
लवलवता देह, थिरकती पावलं,...
अंगोपांगी सळसळता उत्साह...
मनभावन अविष्कार, माझ्या डोळ्यासमोर,
मी असा साक्षात, उलगडताना पाहिला !!!

तिला पाहताना, तिच्या सोबत, मीही मग परांसारखी हलकी हलकी होऊन, तरंगत झुलत राहिले...

वेळ, कसा आणि किती गेला.., काही कळलंच नाही...!!
भानावर आले तेव्हा, समोर ती नव्हती.
आजूबाजूलाही तिची चाहूल नाही,
की तिचे पदरव ऐकू येत नव्हते.

जे आत्ता इथे घडले, ते नक्की काय होतं?

गंधाचं रसायन की रंगांचं इन्द्रधनुषी पटवर्धन...!
रुपकाचा पिसारा की रसवंतीच्या अमृत धारा...!
सप्त स्वरांची सूरावट की अव्यक्ताची सरगम...!

काय होतं ते...? आणि कोण होती ती?..
सहज अभिव्यक्ती की छांदसी प्रतिभा....?
कोण होती ती.?..

अवचित येणारी.., बिलगून विलगणारी...,
आणि दूर निघून गेली तरी, आपला अर्थगर्भ ठसा मागे ठेवून जाणारी,
सर्जनशीलता की नवउन्मेषी निर्माण ऊर्मी?

ती नक्कीच इथे आली होती, जरी आत्ता ती इथे नाही!!
कारण माझ्या पुढ्यातले ताव, आता सुबक दाणेदार अक्षरांनी सजले आहेत.
कोवळ्या अक्षय भावनेने भिजले आहेत.

जणू तिची लयदार पदचिन्हंच, तिच्या नाजूक अविर्भावासह त्यावर उमटली आहेत..!

तिची चित्घन नृत्यलीन साधना, ह्या इथे,
अशी सुफलीत, अवतरीत झाली आहे...!!

# भोग

**संजय शरद दळवी**



तुझ्या आकाशीच्या छताखाली ढळेल जेव्हा बुद्धी माझी

आणि अधिरे हात जेव्हा लुटतील अब्रू मांगल्याची,

तेव्हा मला तुझी क्षमा नको

क्षमा नको... शाप हवा... अश्वथामि!

उजाडलेल्या त्याच जगात,

बोचतील जेव्हा जाणिवा अनंत टोकांनी

नि तळमळेन जेव्हा अंतरीच्या वेदनांनी

त्यावेळी कदाचित, चूक माझी मलाच कळेल

नि उमगेल मग...

पापी असलो, तरी आपण माणूस आहोत,

माणुसकीच्या थोर उपासकांचे वारस आहोत !

म्हणून - आपल्या भोगालाही

पावित्र्याची साक्ष हवी...

जिवंत माणुसकीची शेज हवी !

# Art Gallery




Attempted Capturing the gaze of the legendary actor PranSaab, known as the All time great villain of Hindi Cinema, through this pencil sketch.

12th Feb was his Birth Anniversary.

Drawn on -

Paper : Grey textured. A4 size

Pencil : Graphite (2B, HB, 8B)

**Sanjay Parab**

# Prabhu Tarun Diary

**Donations**

- Rs. 2000/- donation received from  Suvarna Pramod Mankar towards the 75th Birthday of Pramod Shreevallabh Mankar on February 28, 2024.
- On the occasion of 75th birthday Rs. 1001/- donation received on March 3, 2024 from Hemant Anant Kothare.

**Examination Results**

- Dr. Saniya Nitin Nikita Navalkar, has graduated in Bachelor of Physiotherapy, with a cGPA score of 8.35

**Births**

- Akshay Anjan Kothare and Aadya Akshay Kothare were blessed with a son on 30th January 2024, Andheri, Mumbai.

**Wedding Anniversary**

- Surendra & Minal Dhurandhar celebrated their 50th Wedding Anniversary on 25th January 2024.

**Om Shanti. We lost these members in the recent past.**

- Mr. Shrikant Mukund Mankar, Age 82 yrs, departed on 20/1/2024 at Pune
- Smt.Mugdha Ravindra Navalka,r Age 87 yrs, departed on 23/1/2024.at Prabhadevi, Mumbai
- Mrs. Kalpana Nihar Navalkar, age 50 years, departed on 28/1/2024. At Andheri, Mumbai
- Mr.Ravindra Nanuji Navalkar, age 100 years, departed on 29/1/2024 at Kandivali, Mumbai
- Mrs. Sharmila Suresh Deshmukh, nee Nilambari Kunjavihari Nayak, Age 63 years ,departed on 3rd Feb.2024.-Pune
- Mr. Ashit Shashikant Zaoba departed on 6th February 2024

# Credits



**Kalpana Rane**

Editor



**Rohit Trilokekar**

Resident Editor



**Monica Rane Iyer**

Editorial Support



**Sanjana Kothare**

Editorial Support



**Shrinal Kothare**

Design Head



**Sunil Pawar**

Web Master